# उज्जीवन फायनान्शिअल आयपीओ लवकरच खुलणार

मुंबई – उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेस लि. ही एक नॉन बँकिंग फायनान्शियल कंपनी २००५ साली खुली करण्यात आली. यंदाच्या वर्षाच्या कंपनीचे आयपीओ येत्या २८ एप्रिलला खुले होणार असून ते २ मे रोजी बंद होईल. याची किंमत २०७ रुपयापासून ते २१० रुपयापर्यंत असेल.

कंपनीतर्फे देण्यात आलेल्या आयपीओमध्ये ३,५८१.६१ दशलक्ष इतक्या शेअरचा ताजा इश्यू समाविष्ट असून इलेवार, एफएमओ, आयएफसी, आयएफआयएफ, एमयुसी, सर्वा कॅपिटल, डब्ल्यूसीपी आणि डब्ल्यूडब्ल्यूबी द्वारे २४,९६८,३३२ पर्यंतच्या इक्विटी समभाग विक्रीची ऑफर असेल. ही ऑफर बुक बिल्डींग प्रोसेसच्या माध्यमातून खुली होणार असून त्यात ऑफरच्या ५० टक्के भाग पात्र संस्थात्मक खरेदीदारच्या प्रमाणात असणार आहे. परंतु कंपनी आणि विक्री करणारे समभागधारक हे बीआरएलएमच्या सल्ल्याने क्युआयबी वर्गवारिच्या ६० टक्के प्राथमिक गुंतवणूकदारांना विभागून देता येतील.